REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# "अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणात राजकीय पक्षांची भूमिका"

डॉ. कैलास बाबूराव सोनवणे[1] . प्रा. एकनाथ सिताराम निर्मळ[2]
[1]मार्गदर्शक , संशोधन केंद्रः राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .
[2]संशोधक विद्याथी, संशोधन केंद्रः राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .

## कृषी व सिंचन क्षेत्राचा विकास ः



शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने प्रथम शेती विकास साधणे गरजेचे होते. त्यानुसारच स्वातंत्र्याच्या काळात शासकीय धोरणे राबवली गेली. यासाठी सिंचन क्षेत्र वाढविण्याचे अधिक प्रयत्न झाले. तरीही प्रारंभीच्या काळात जिल्हयात विशेष प्रयत्न झाले नाहीत.अहमदनगर जिल्हयातील मुळा व भंडारदरा हे मोठे प्रकल्प तसेच गंगापूर, जि.नाशिक तसेच घोड कुकडी या पुणे जिल्हयातील मोठया प्रकल्पांच्या कालव्याच्या पाण्याद्वारे जिल्हयातील क्षेत्र ओलिताखाली आणले जाते. या प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता **208** हजार हेक्टर आहे. त्याचप्रमाणे विसापूर आढळा पारगाव, घाटशिल, मांडओहोळ, भोजापूर, माहेसांगवी व सीना या मध्यम प्रकल्पांची क्षमता **71** हजार हेक्टर आहे. एकूण **109** लघुपाटबंधाऱ्यांची सिंचन क्षमता **19** हजार हेक्टर आहे.जिल्हयातील लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत प्रामुख्याने कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची कामे पूर्ण केलेली असून त्यामुळे जिल्हयाला चांगला फायदा झालेला आहे.जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र **16.68** लक्ष हेक्टर असून **2004** या वर्षापर्यंत एकूण पिकाखालील क्षेत्र **1326156** हेक्टर होते. त्यापैकी निव्वळ पिकाखालील क्षेत्र **1667788** हेक्टर व एकापेक्षा अधिक निव्वळ लागवड केलेले क्षेत्र **140310** हेक्टर होते. एकूण लागवडीखालील क्षेत्राशी दुबार पिकाच्या क्षेत्राचे प्रमाण **11.16** टक्के इतके होते.

जिल्हयातील कृषीविद्यापीठाच्या स्थापनेमुळे नंतर शेती सुधारांचे स्वरूप बदलत गेले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शेती विकासाचे धोरण ही बदलत गेली. शेतकरी मेळावे, कृषी प्रदर्शने, कृषी प्रात्याक्षिके, शैक्षणिक सहल, प्रशिक्षणे वाढत गेली. यासाठी शासकीय अनुदाने दिली गेली. या शिवाय कर्जमाफी, वीजबिल माफी, अल्प व्याज दराने कर्ज पुरवठा, अनुदाने, विद्युत मोटार पंप, पाईपलाईन साठी पीव्हीसी पाईप, विद्युत जोडणी केली गेली. यामुळे जिल्हयाच्या बहुतेक भागात जेथे पाण्याची सुविधा आहे, अशा भागात शेती क्षेत्रात मोठया प्रमाणावर सुधारणा झालेल्या दिसतात.

शेती सुधारातील या विकासामुळे शेतकरी जीवनात आमूलाग्र बदल झाला. शेतकरी प्रगतशील शेतीकडे वळला. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर तो करू लागला. जसजसे शेती सुधारत गेली तसतसा शेतकरी स्वयंपूर्ण बनत गेला. शेतीचे उत्पन्न वाढले तसा त्याचा आर्थिक दर्जा ही सुधारला. परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे काही भागात अवर्षणजन्य परिस्थिती देखील निर्माण झाल्याचे दिसते.

## राजकीय पक्षांचे सहकार क्षेत्रातील अर्थ कारण

सहकार चळवळीमुळे या जिल्हयाची देशभरात ओळख निर्माण झालेली आहे. सहकार चळवळीतून निर्माण झालेली सहकारी साखर कारखानदारी, सहकारी संस्था, सहकारी सोसायटया, शैक्षणिक संस्था या जिल्हयाच्या ग्रामीण भागापर्यंत पोहचल्याने लोकजागृती होऊन राजकारणाला नवे वळण लागले आहे. या जिल्हयात राहाता तालुक्यातील विखे घराणे, संगमनेरचे थोरात घराणे, कोपरगाव तालुक्याचे काळे - कोल्हे घराणे, पाथर्डी

तालुक्यातील राजळे - ढाकणे घराणे, नेवासा तालुक्यातील घुले - गडाख घराणे, अकोले तालुक्यातील पिचड घराणे, श्रीरामपूर तालुक्यातील मुरकुटे - ससाणे घराणे, राहुरी तालुक्यातील तनपुरे घराणे इत्यादी घराण्यांनी सहकार हा स्थानिक राजकारणाचा आधार मानून अलिकडील काळात तालुक्याच्या राजकारणाबरोबरच अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणातही सहकाराच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सन **1921** मध्ये डॉ. मॅन यांनी अहमदनगर व सोलापूर जिल्हयात सहकारी शेतीचा प्रयोग केला होता. कर्जत तालुक्यात पहिली सहकारी पतपेढी स्थापन झाली होती. नंतर श्रीरामपूर तालुक्यात सहकारी चळवळीचे चांगले दिवस आले. त्याखालोखाल कोपरगाव तालुक्यातही सहकारी चळवळीने चांगलाच जोर धरला. सहकारी चळवळीच्या संदर्भात अहमदनगर जिल्हयाने इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. सन **1949** मध्ये गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेचे संस्थापक धनंजय गाडगीळ यांनी पदमश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहकार्याने प्रवरानगर येथे सहकारी तत्वावर साखर कारखाना उभारला. त्यानंतर नगर जिल्हयामध्ये सहकारी साखर कारखानदारीचे जाळे उभे राहिले. सहकार ही एक जीवनपद्धती म्हणून भारतीय संस्कृतीत यांचा फार पुरातन काळापासून वापर झाला आहे. आपल्या संस्कृतीत सहकार सहजीवन सहकार्य सामूहिक जीवन या सगळया गोष्टींना फारच महत्व आहे. कुटुंब, गोत्र, जात, जमात अशा वेगवेगळयाप्रकारे मानवी समूहाने एकत्रित जीवन जगण्याचा मार्ग म्हणजे सहकार या तत्वाला अनुसरून कोपरगाव, राहुरी व श्रीरामपूर परिसरात शेतकरी फड पद्धतीने ऊसाची पिके काढत होते. ही फड पद्धत म्हणजेच ऊसाची सहकारी शेती होती कोणाची जमीन असे, कोणाची बैल असत, कोणी नुसतेच कष्ट मशागत करते व येईल ते उत्पन्न हिस्से पद्धतीने वाटून घेत असत. या फड पद्धतीत लिखित नियम नाही. सर्व काही रूढील अनुसरून परस्परांच्या विश्वासाने चालते हीच पद्धत सहकारी चळवळीचा पाया बनत गेला. भिशी ही एक सहकाराची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत आहे. भिशीचा उद्देश लोकांना सक्तीची बचत करायला लावणे आणि गरजू लोकांना हमीवर वाजवी व्याज देऊन धनाचा पुरवठा करणे, हे भिशीचे सभासद आपल्या मिळकतीचा काही भाग म्हणून भिशीला देतात. दर तीन वर्षांनी किंवा पाच वर्षांनी ठेव ज्याची त्याला व्याजासह पर करतात. अशा सामूहिक संस्था खेडयापासून अनेक वर्ष काम करीत होत्या. या संस्थांना लिखित नियम नव्हते. त्या लोकांनी नियुक्त केलेल्या पंचाकडून रूढीप्रमाणे विश्वासाने चालविल्या जात असत. सहकाराचा जरी अर्थ माहित नसला तरी त्या पद्धतीने कार्य चालू होते.

## अर्थकारणाचा आधार सहकारी साखर कारखानदारी

अहमदनगर जिल्हा हा जसा कृषिप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो, तसाच तो साखर सम्राटांचा जिल्हा म्हणून देखील ओळखला जातो. अहमदगर जिल्हयातील **14** तालुक्यातून मिळून **22** साखर कारखान्यांची स्थापना झालेली असून त्यात सहकारी क्षेत्रा बरोबरच खाजगी क्षेत्राचा देखील मोठा वाटा असल्याचे अभ्यासातून दिसून येते. यामध्ये जास्तीजास्त उस उत्पादक तालुक्यांचा समावेश असल्याने देखील या भागात मिळणारा कच्चा माल म्हणजे उस व त्यावर अधारित कारखान्यांची भरभराट झाली आहे. याशिवाय या कारखान्यांच्या परिसरात इतरही व्यवसाय वाढीस लागलेले दिसतात. कारखाने सहकारी तत्वावर असल्याने दर पाच वर्षाने होणाऱ्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत मोठया प्रमाणावर चुरस निर्माण होते. त्यातून विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणूकांचे भवितव्य ठरत असल्याने या निवडणुका अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जातात. महाराष्ट्राच्या राजकारणावर शुगर लॉबीचा मोठा प्रभाव असल्याचे म्हटले जाते. त्याचे एक महत्वाचे कारण हेच आहे की साखर कारखान्याच्या राजकारणाचा बारकाईने विचार केला जातो.

वैकुंठभाई मेहता डॉ. धनंजय गाडगीळ आणि पदमश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी सन **1950** साली अहमदगगर जिल्हयात पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. एका अर्थाने डॉ. धनंजय गाडगीळ आणि वैकुंठभाई मेहता हे साखर कारखान्यांचे प्रवर्त क व दिशादर्शक होते. ब्रिटीश सरकारणे **1925** मध्येच सहकाराचा कायदा केला होता. पण तो तसाच सरकार दप्तरी धूळ खात पडलेला होता. सहकार म्हणजे काय याची जनतेला पुरेशी कल्पना नव्हती. पण डॉ. धनंजयराव गाडगीळ वैकुंठभाई मेहता यांनी या कायद्याला पुन्हा जिवंत केले आणि सहकाराचा अर्थ खेडयापाडयात पोहचविला.

## शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक वाटचाल

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच अहमदनगर जिल्हयातील नेतृत्वाने शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान दिलेले दिसते. आज जिल्हयातील प्रत्येक ग्रामीण भागापर्यंत शिक्षणाची व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात राजकीय भूमिका महत्वाची ठरली आहे. मराठा जिल्हा प्रसारक शिक्षण संस्था, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, विखे फाऊंडेशन, मालपाणी शिक्षण संस्था, त्रिमूर्ती शिक्षण संस्था, यासारख्या विविध संस्थांनी शैक्षणिक क्षेत्रात भर टाकलेली दिसते. याशिवाय आज प्रत्येक तालुक्यातील नेतृत्वाने

आपली स्वतःची शैक्षणिक संस्था उभ्या केलेल्या दिसतात. अहमदनगर जिल्हयात **26** रूग्णालय, **9** दवाखाने, **96** प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत तसेच कृषी विद्यापीठ **2010** अखेर जिल्हयात **3,443** प्राथमिक **190** उच्च मध्यमिक शाळा जिल्हयात आहेत.

## रस्ते दळणवळण व धार्मिक क्षेत्र विकास

मध्य रेल्वेचा **197** कि.मी. लांबीचा मार्ग जिल्हयातून जातो. सर्व प्रकारच्या **12,877** कि.मी. लांबीच्या रस्त्यांनी जिल्हयातील **1,506** गावे जोडली आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे प्रवासी वाहतुकीचे विस्तृत जाळे या जिल्हयात आहे. एस.टी. महामार्गाची एकूण लांबी **54,246** कि.मी. असून एस.टी. महामंडळाच्या **699** बसेस या रस्त्यांवर धावतात.

अहमदनगर जिल्हयाची अन्नधान्याची बाजारपेठ महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. कृषी, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केलेले पारनेर तालुक्यातील राळेगण सिध्दी हे गाव आदर्श खेडे म्हणून प्रसिध्द असून भारतातील विविध राज्य प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते तेथे अभ्यासासाठी भेट देत असतात. तसेच नगर तालुक्यातील हिवरे बाजार हे पाणलोट क्षेत्राबाबत प्रसिद्ध झाले आहे.

श्री साईबाबा संस्थान शिर्डी व अवतार मेहेरबाबांचे मेहराबाद ही अहमदनगर जिल्हयाची धार्मिक स्थळे ही भारतातील नव्हे तर जगातील अनेक भक्तांची श्रध्दास्थाने आहेत. याशिवाय श्री ज्ञानेश्वर मंदिर (नेवासा), श्री शनी शिंगणापूर, श्री दत्त मंदिर (देवगड) व श्री सिध्दी विनायकाचे सिध्दटेक (कर्जत) या तीर्थ क्षेत्रांनी भाविकांच्या मनात अहमदनगर जिल्हयाचे आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास

ग्रामीण विकासासाठी जिल्हा परिषद प्रशासनाखाली जिल्हयात प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे एकूण **14** पंचायत समित्या आहेत. जिल्हयात **1,311** ग्रामपंचायती, **1** नगर पंचायत शिर्डी आहे. **2011** च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात पुढीलप्रमाणे **18** नागरी भाग आहेत. कॅन्टोन्मेंट प्रशासनाखाली (**1**) अहमदनगर कटक मंडळ (**2**) महानगरपालिका, अहमदनगर (**3**) राहुरी (**4**) देवळाली प्रवरा (**5**) श्रीरामपूर (**6**) पाथर्डी (**7**) श्रीगोंदा (**8**) संगमनेर (**9**) कोपरगाव (**10**) राहता पिंपळस या नगरपालिका आहेत. याशिवाय शिर्डी ही नगरपंचायत आहे. श्रीरामपूर (आर), कोपरगाव तालुक्यातील शिंगणापूर, अहमदनगर तालुक्यातील नागापूर, नागदेवळे, भिंगार, संगमनेर तालूक्यातील घुलेवाडी व जामखेड असा **9** नगरपालिका नसलेले नागरी भाग आहेत.

यात 'ड' वर्ग महानगरपालिका अहमदनगर, 'व' वर्ग श्रीरामपूर, कोपरगाव, संगमनेर अशा **3** नगरपालिका आहेत. उर्वरित 'क' वर्गातील नगरपालिका आहेत. तसेच **1** नगर पंचायत जिल्हयात आहे.

सर्व शासकीय योजनांचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून घेऊन अहमदनगर जिल्हयातील लोकांनी एकेकाळी दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणा-या या जिल्हयाचा चेहरा मोहराच बदलून टाकला आहे. सेंट्रल बॅक ऑफ इंडिया ही अग्रणी बॅक असून जिल्हयात **570** व्यापारी बॅकांची कार्यालये आहेत. आशिया खंडात सहकार क्षेत्रात प्रथम कमांकावर असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या व इतर सहकारी बॅकेच्या **296** शाखा जिल्हयात मार्च **2009** अखेर कार्यान्वित होत्या.

## संदर्भ

**1**. घोटाळे विवेक (**2005**), महाराष्ट्रातील आघाडयांचे राजकारण **1989** ते **2004**, एम.फिल शोधप्रबंध राज्यशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ

**2**. Jagzap Harsh (1997), Land, Caste & Political Power in Maharashtra, Ph.D. Thesis- Pune University,Pune-1997

**3**. हाडे व पांगरे (**1996**), आदर्शगाव संकल्प आणि प्रकल्प जनतेच्या कार्यात शासनाचा सहभाग, प्रकाशन पुणे हिंद स्वराज ट्रस्ट **1996**

**4**. थिटे दिनेश (**1996**), महाराष्ट्र विधानसभा **1975** ते **1995** एक अभ्यास सत्ता व जात यांचा परस्पर संबध, एम. फील प्रबंध पुणे विद्यापीठ

5. Gopalan S. (1984), Housing for the Economically Weaker Section, Sarita Prakashan Meeruts 12th - 17th Nov. Vol. No. 2. pp. 757-764

6. जनगणना अहवाल (1991), भारत सरकार. लोकसंख्या वितरण.

7. भंडारे यशवंत (2010), ‘झोपडपट्टी मुक्तीचा लातूर पॅटर्न ’ जाने. लोकराज्य 2010 पृष्ठ. क. 93

8. लोकराज्य (2010), “नागरी स्वच्छता कार्यक्रमात कल्याण डोंबिवली मनपास यश”, पृष्ठ. क. 37

9. लोकराज्य (2010) ‘नाशिक ः तीर्थक्षेत्र ते आयडियल सिटी’ लोकराज्य 2010 पृष्ठ. क. 40

10. ढवळे जे. एस. (2005), भारतीय संविधनातील पक्षांतर बंदी कायदा एक चिकित्सक अभ्यास, 1985 ते 2005 विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य.

11. बनसोडे कैलास (2012), इंदिरा गांधींचे भारतीय राजकारणातील योगदान पीएच डी. प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.